REVIEW OF RESEARCH

# समाजशास्त्रीय दृष्टीकोनातूनसांगली जिल्ह्यातील महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराचा सद्यस्थितीचा अभ्यास

प्रा. पवळ रंजना भिमराव

सहा. प्राध्यापक, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर. ता. वाळवा, जि. सांगली.

ISSN: 2249-894X
IMPACT FACTOR : 5.7631(UIF)
UGC APPROVED JOURNAL NO. 48514
VOLUME - 8 | ISSUE - 8 | MAY - 2019



## प्रस्तावना :

मानव हासमाजशील प्राणी आहे. मानवाच्या जीवनात जन्मापासूनते मृत्यूपर्यंत कुटुंबव्यवस्थेचे महत्वपूर्ण असे दोन घटक आहेत. पुरुषांच्या जीवनामध्येस्त्रीचे स्थान अत्यंत अर्थपूर्ण महत्वपूर्ण प्रभावशाली मानण्यात आले आहे. परंतुसमाजातील विविध विचार, परंपरा, रितीरिवाज यामुळे स्त्रियांच्या पदरी अपमानित, शोषित यातनामय जीवन आले आहे.

"यत्र नार्यस्तु पूजन्ते,
रमन्ते तत्र देवता"

अर्थात जेथेस्त्रिची पूजा केली जातेतेथेच देवता वास करतात. स्मृतीमध्येस्त्रीचे सांगितलेले महत्व प्राचीन महिलांचा सर्वोच्च दर्जा सिद्ध करते. वाढते अत्याचार यामुळे देवी समजल्या जाणाऱ्या स्त्रिचीस्थिती फारच दयनीय झाली आहे.

स्वातंत्र्योत्तर कलखंडातस्त्री रक्षणासाठी अनेक कायदे करण्यात आले त्यातच शिक्षणाचा प्रसार झाला. स्त्रियांना अर्थाजनाच्या संधी उपलब्ध झाल्या त्या स्वावलंबी बनल्या असल्या तरी स्त्रिया अजूनहीहिंसाच्या बळी ठरत आहेत.

कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचेसंरक्षण करणारा कायदा २००५ ला संमत करुन २६ ऑक्टोंबर २००६ रोजी भारतात लागू करण्यात आला. या कायद्यामुळे कौटुंबिक हिंसाचाराची व्याख्या व्यापक झाली असून शारीरिक, मानसिक, लैंगिक, भावनिक छळाची धमकी देणे इ. बाबीचा त्यात समावेश करण्यात आला आहे.

### व्याख्या :-

**कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचेसंरक्षण करणारा कायदा २००५ :-** या कायद्यानुसार, व्यथित स्त्रीच्या शारीरिक किंवा मानसिक आरोग्यास, सुरक्षिततेस एकुण जीवितास, कल्याणास धोकादायक परिस्थितीत नेणारे वातावरण तसेच व्यथित स्त्रिच्या जीवनास किंवा कोणत्याही अवयास घातक किंवा उपद्रवी ठरेल अशी वागणूक व्यथित स्त्रीचा लैंगीक छळ, लैंगीक दुरुपयोग, शाब्दिक किंवा भावनिक छळ आर्थिक छळहोत असेलतरतो कौटुंबिक हिंसाचार समजला जाईल.

### ४९८ अ :-

जाणीवपूर्वक केलेल्या कोणत्याही कृत्यामुळे पत्नीला आत्महत्या करण्यासारखी परिस्थिती निर्माण केली किंवा गंभी दुखापत केली असेलतर अशा कृत्यांचा समावेश छळ या व्याख्येत करण्यात आला आहे.

### कौटुंबिक हिंसाचार व्याप्ती :-

केंद्रसरकारने कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचेसंरक्षण करण्यासाठी २००५ मध्ये कायदा संमत केला आहे. या कायद्यानुसार कौटुंबिक हिंसाचारातस्त्रीचा तिच्या पतीने किंवा इतर नातेवाईकांनी, लिव्ह इन रिलेशनशिप या तत्वानुसार एकत्र राहणाऱ्या स्त्री-पुरुषांपैकी पुरुषाने त्याच्या नातेवाईकांनी त्या स्त्रीचा शारीरिक, भावनिक, लैंगीक, आर्थिक छळ करणे या कृतीचा समावेश होतो.

- **कौटुंबिक हिंसाचार प्रकार :-**

### १. शारीरिक छळ/हिंसाचार :-

व्यथित अन्यायग्रस्त स्त्रीच्या शरीरास दुखापततसेच जीवास धोका शरीराच्या कोणत्याही अवयवास किंवा आरोग्यास हानीकारक असे कृत्यत्याचप्रमाणे नैसर्गिक विकासात अडथळे आणणाराहल्ला किंवा गुन्हेगारी याला शारीरिक छळ असे म्हणतात. **उदा.** स्त्रियांवर जीवघेणे वार करणे, शॉक देणे, उपाशी ठेवणे, आजारपणात औषधोपचार न करणे इत्यादी.

### २. मानसिक छळ/हिंसाचार :-

"अन्यायग्रस्त स्त्रीचा अपमान, टोचून बोलणे, मूल न होण्याबद्दल, हुंडा न दिल्याबद्दल अपमान करणे किंवा उपहासात्मक बोलून

LBP PUBLICATION

तिच्याबद्दल विनोद करणे, तिच्या मनावर दबाव आणणे तिच्या मनावर सततची भिती निर्माण करणे या प्रकारचा छळ म्हणजे मानसिक छळहोय. **उदा.** स्त्रिला नियंत्रणात ठेणे, पिडीतस्त्रीला धमक्या देणे, अपराधीपणाची भावना निर्माण करुन देणे, चोरीचा आरोप करणे, ब्लॅकमेल करणे इत्यादी."

### ३. आर्थिक छळ/हिंसाचार :-

"व्यथित स्त्री जेव्हा कायदेशीररित्या एखाद्या संपत्तीची मालक आहे किंवा आर्थिक लाभ होण्यास पात्र आहे. तेव्हा त्या स्त्रीवर दबाव आणून त्यांना आर्थिक लाभापासून वंचित करणेतसेचस्त्रीधनसंयुक्त मिळकत, एकत्र घराचे येणारे भाडे की त्यमध्येस्त्रीचा अधिकार आहे. अशावेळी तिच्यावर दडपण आणून तिच्या हक्कावर गदा आणलीतरतो आर्थिक छळठरतो." **उदा.** हुंडा घेणे, स्त्रीचे दागिने हिसकावून घेणे, घरखर्चासाठी पैसे न देणे, गाडी, घर घेण्यासाठी माहेरहून पैसे आणण्याची मागणी करणे इत्यादी.

### ४. लैंगीक छळ/हिंसाचार :-

लैंगीक स्वरुपाचे कोणतेही शोषण आणि अत्याचार म्हणजे लैंगीक छळहोय. की ज्यामुळेस्त्रीच्या प्रतिष्ठेस, पावित्र्यास हानी पोहचेल तिचा सन्मान यांच्यावर अतिक्रमण करणारे कृत्य केले जाईल. अशा बाबी या लैंगीक छळाचा भाग मानला जातो. **उदा.** चारित्र्यावर संशय घेणे वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडणे.

### ▪ उद्दिष्टे :-

१. महिलांवरील होणाऱ्या हिंसाचाराची कारणे अभ्यासणे.
२. कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत महिलांना उद्‌भवणाऱ्या समस्यांचा अभ्यास करणे.
३. कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत महिलांचीसद्यस्थिती अभ्यासणे.
४. कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत महिलांच्या पुनर्वसनासाठी उपाययोजना शोधणे.

### ▪ समस्यासूत्रण :-

व्यक्तीच्या जडणघडणीत कुटुंबसंस्थेचे स्थान अतिशय मोलाचे आहे. कुटुंबाच्या सर्व भूमिकांमध्येस्त्रीही केंद्रस्थानी दिसून येते. तरीही आज स्त्रीवर घरात व घराबाहेर अन्याय अत्याचारहोत आहेत. त्यामुळे स्त्रियांवर होणाऱ्या कौटुंबिक हिंसाचाराचा अभ्यास करणे गरजेचे आहे. आज जगात तीन महिलांमागे एका महिलेवर कौटुंबिक अत्याचारहोतो. आशिया खंडात युनिफेमच्या अहवालानुसार कौटुंबिक हिंसेला ५०% महिलांना रोज कोणत्या ना कोणत्या अत्याचारालासामोरे जावे लागत आहे. त्यामुळेसांगली जिल्ह्यातील महिलांवरील कौटुंबिक हिंसाचाराच्या सद्यस्थितीचे अध्ययन हा विषय संशोधनासाठी निवडला आहे.

### ▪ संशोधन आराखडा :-

संशोधन आराखड्याचे महत्व लक्षात घेवून संशोधनाकरिता अन्वेषनात्मक व निदानात्मक अशा एकत्रित स्वरुपाचा आराखडा वापरण्यात आला आहे.

### ▪ कौटुंबिक हिंसाचाराची कारणे

१. पितृसत्ताक व्यवस्था
२. हुंडाप्रथा
३. पुरुषांची व्यसनाधिनता
४. महिलांमधील आर्थिक असुरक्षितता
५. मूलबाळ न होणे
६. पतीचे विवाहबाह्य अनैतिक संबंध असणे.
७. स्वयंपाक करता न येणे.
८. संशयी स्वभाव
९. पुरुषाच्या इच्छेविरुद्ध विवाह संपन्न होणे.
१०. प्रेमविवाह
११. सुनेच्या आगमनानेसासूच्या स्थानाला बसणारा धक्का

१२.सासरशी व पतीशीसमायोजन साधण्यात अपयश
१३.आंतरविवाह

## ■ कौटुंबिक हिंसाचारावरील उपाययोजना :-

१. कायदेशीर उपाययोजना
२. महिलासंघटना
३. जाणीव जागृती
४. स्त्रियांची आर्थिक स्वयंपूर्णता
५. विवाहितेने छळाबद्दल माहिती प्रकाशात आणावी
६. स्त्रियांनी सावधानतेने व हुशारीने वागावे
७. सासारच्या लोकांच्या मनोवृत्तीत बदल व्हावा
८. सामाजिकसंघटनांची जबाबदारी

## ■ कौटुंबिक हिंसाचार आणि स्त्रिया :-

### १) परितक्त्या स्त्रियांचा प्रश्न :-

परितक्त्यास्त्री म्हणजे नवऱ्याने टाकून दिलेलीस्त्रीहोय. काहीवेळा नवरा क्षुल्लक कारणाने पत्नीला घरातूनहाकलून देतो अशीस्त्रीसुद्धा परितक्त्या म्हणता येईल.

परितक्त्या म्हणजे पती पत्नी त्या दोन व्यक्तीपुरता कायद्याचीसंमत्ती नसलेला परंतू स्वयंनिर्णित असा विवाहविच्छेद होय.

वैवाहीक बंधन भंग न करता पती पत्नींनी वेगवेगळे राहणे म्हणजे परित्यागहोय.

परित्यागातूनस्त्रियांची गंभीर समस्या निर्माण झाली आहे. महाराष्ट्रात परितक्त्यास्त्रियांची संख्या बरीच आहे. १५ मर्च १९९१ दरम्यान समाज प्रबोधनासाठी परितक्त्या मुक्ती यात्रा पुणेते मुंबई दरम्यान काढण्यात आलीहोती.

परितक्त्यास्त्रियांपुढे मुलांच्या पालनपोषणाचा प्रश्न निर्माण होतो. त्यांना स्वतःचे स्वतंत्र घर उभे करावे लागते. परितक्त्या अशिक्षित असतीलतर त्यांना शेतमजूरी, दुसऱ्याच्या घरी धुणी भांडी करण्याशिवाय पर्याय राहत नाही. परिणामी तिल अनेक अडचणींनासामोरे जावे लागते.

### २) घटस्फोटीत स्त्रियांचा प्रश्न :-

भारतीय समाजात विवाहास पवित्र संस्कार मानण्यात आला आहे. पती पत्नीचे संबंध कधीही भंग होत नाहीत अशी मान्यता आहे. विशिष्ट परिस्थितीत घटस्फोटास मान्यता दिलीहोती. विशेष म्हणजे घटस्फोटहा धर्माविरुद्ध आहे असे मानले जायचे. घटस्फोटाला 'काडीमोड' असा शब्द वापरला जायचा, काही ठिकाणी त्यास सेडचिठ्ठी असे देखील म्हणतात.

सर्वप्रथम बडोदा राज्यात १९४२ मध्ये घटस्फोटाचा कायदा मंजूर करण्यात आला. त्यानंतर १९४६ मध्ये मुंबई राज्याने घटस्फोट अधिनियम पास केला. १९४९ मध्ये मद्रास राज्यानेतर १९५२ मध्येसौराष्ट्र राज्याने घटस्फोटाचा कायदा मंजूर केला.

घटस्फोटही सामाजिक समस्या आहे. घटस्फोट घेणारी जरस्त्री असेलतर तिला वाईट वर्तणुकीची ठरवली जाते, जवळचे नातेवाईक देखील पूर्वीसारखे नातेसंबंध ठेवत नाहीत. परिणामी तिला भावनिक संघर्षाला सामोरे जावे लागते.

घटस्फोट घेतल्यामुळेस्त्रीपुढे आर्थिक प्रश्न निर्माण होतो. घटस्फोट मिळाल्यानंतरस्त्रीला पोटगी मिळणेही न्यायालयीन कटकटची घटना आहे. तसेच पोटगीही प्रत्येक महिन्याच्या ठराविक तारखेलाच मिळेल याची शाश्वती नसते. न्यायालयात त्यात अशिक्षित स्त्रीयांच्या संदर्भात ही फार मोठी समस्या उद्भवली आहे.

### ३) विवाहीत स्त्रियांच्या आत्महत्या किंवा मृत्यू :-

भारत सरकारच्या १९९३ च्या एका अहवालानुसार देशात एका दिवसात ३३ हत्यातर एका वर्षात ५००० हत्याहोतात. युनिसेफच्या "The progress of nations १९९७" या आंतरराष्ट्रीय अहवालानुसार भारतात दरवर्षी ५००० पेक्षा जास्त महिलांचीहुंड्यासाठीहत्या केली जाते.

मुलीच्या सासरच्या लोकांनी केलेल्या सर्व मागण्या पूर्ण करणे मुलीच्या आई वडीलांना शक्य नसते अशावेळी सासरचे लोकसुनेचा छळ करतात या छळाचे शेवटचे टोक म्हणजेसुनेला जाळून मारणे, विजेचा करंट देऊन तिचा मृत्यू अपघात आहे असे दर्शविणे, प्रसंगी विष देणे, विहीरीत ढकलून देणे, फास लावणे अशा प्रकारे हुंडाबळीची प्रकरणेहोतात.

१९४६ मध्ये भारतीय दंडसंहितेत दुरुस्ती करुन Section ३०४ ब त्यात समावेश केलात्यानुसार 'हुंडाबळी' या संज्ञेची व्याख्या करण्यात आली.

"एखादीस्त्री विवाहानंतर ज्ञात वर्षाच्या आत जळालेल्या अथवा इतर जखमांमुळेसंशयास्पदस्थितीत मृत्यूमुखी पडली आणि हुंड्याच्या मागणीसंदर्भात मृत्यूच्या अगदी आधी तिला तिच्या पतीने अथवा त्याच्या नातेवाईकांनी केलीहोती किंवा तिचा छळ केलाहोता असे सिद्ध केलेतर अशा मृत्यूला 'हुंडाबळी' असे मानण्यात येईल."

### ४) लोकसंख्येतीलस्त्रियांचे घटते प्रमाण :-

भारतासारख्या देशात स्त्रीपुरुष असमतोल मोठ्या प्रमाणात जाणवतो त्यचे कारण म्हणजे स्त्रीभ्रूण हत्याहोय. स्त्रीभ्रूण हत्या म्हणजे गर्भ स्त्रीचातर गर्भपात करुन संपवणे. कॅनडातील Lancet Journal नुसार भारतात सुमारे ५ लाख स्त्रीभ्रूण हत्या झालेल्या आहेत.

सन २००१ ते २०११ च्या जनगणनेनुसार भारतात ० ते ६ वयोगटातील दरहजार मुलांमागे ९१४ मुली असून महाराष्ट्रातहेच प्रमाण ८८१ एवढे कमी आहे. संशोधन क्षेत्रात असणाऱ्या सांगली जिल्ह्यात हेच प्रमाण ८८९ आढळून आले आहे.

गर्भलिंग चाचणीमुळे मुलीची संख्या समाजात कमीहोऊ लागलीत्यामुळे सामाजिक कार्यकर्त्यांनी मुलगी वाचवा मोहिमहाती घेतली. 'लेक वाचवा' योजना सुरु केली. २० सप्टेंबर १९९४ रोजी गर्भलिंग प्रतिबंधक असा कायदा आमलात आणला या कायद्यानुसार गर्भलिंग निदानास सक्त मनाई केली.

### ▪ निष्कर्ष :-

बदलत्या काळानुसार आणि सामाजिक परिस्थितीनुसार महिलांसमोरील आव्हाने दिवसेंदिवस वाढत असल्याचे दिसून येते. त्यामुळे फक्तस्त्रीसंरक्षणाचे कायदे करुन समस्या दूरहोतील असे नाहीतरत्यासाठी समाजामध्ये महिला स्वाभिमान, सन्मान आणि आदराची भावना निर्माण करणे आणि त्या दृष्टीने समाजाच्या मानसिकतेत बदल घडवून आणणेही काळाची गरज बनली आहे.

### संदर्भग्रंथ


१. वैरांगडे उज्वला, मुळे विद्युलता, सामुदायिक विकास, विस्तार शिक्षण व महिला सबलीकरण, प्रकाशक-शशिकांतपिंपळापुरे, प्रकाशनस्थळ - विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद प्रकाशन वर्ष २०१२ पृष्ठ क्र. - ३१२.

२. शिरगावे दादासाहेब, कांबळे प्रकाश, माने शैलजा, माने शामला, समकालीन भारतातील सामाजिक समस्या, प्रकाशक - निराली प्रकाशन पुणे, प्रकाशनस्थळ - निराली प्रकाशन पुणे, प्रकाशन वर्ष डिसेंबर २०१४ पृष्ठ क्र. - ४, ५, ६

३. कळदातेसुधा, भारतीय समाज प्रश्न आणि समस्या. प्रकाशक - शशिकांतपिंपळापुरे, प्रकाशनस्थळ - विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद प्रकाशन वर्ष जून २००५ पृष्ठ क्र. - १११.

४. मालती अंक २०१५.

५. कुलकर्णी पी. के. भारतातील सामाजिक समस्या, प्रकाशक - प्रमोद मुंजे, प्रकाशनस्थळ - विद्या प्रकाशन नागपूर, प्रकाशन वर्ष १९९८ पृष्ठ क्र. - २४१.

६. स्त्रोत मिळून साऱ्याजनी - सप्टेंबर २००९

७. खंडागळे चंद्रकांत, कुलकर्णी अरविंद समाजशास्त्र, इयत्ता १२ वी प्रकाशक - कृष्णकुमार पाटील, प्रकाशनस्थळश्री. पिंटर्स पुणे. प्रकाशन वर्ष - २०१३, पृष्ठ क्र. - ८०.

८. मराठे पी. व्ही. महिलांचा घरगुती जुलूमापासून रक्षण करण्यासंबंधीचा कायदा २००२ नियम २००६ प्रकाशक - सी. टी. जे. पब्लिकेशन पुणे, प्रकाशनस्थळ - सी. टी. जे. पब्लिकेशन पुणे, प्रकाशन वर्ष - २०१५. पृष्ठ क्र. - ५१, ५२.

९. ताडपत्रीकर मेधा, कौटुंबिक हिंसाचार वास्तवाला सामोरे जाताना प्रकाशक - डायमंड पब्लिकेशन्स पुणे प्रकाशनस्थळ डायमंड पब्लिकेशन्स पुणे, प्रकाशन वर्ष २०१२, पृष्ठ क्र. - २३, २४,२५, २६, ३३, ३४.

१०. सांगली जिल्हा पोलीस अधिक्षक कार्यालय महिला व बालकल्याण विभाग, जिल्हा परिषदसांगली, सांगली जिल्ह्यातील कौटुंबिक सल्ला केंद्र व समुपदेशन केंद्र.

११. महाजन रघुनाथ कौटुंबिक हिंसाचाराने पिडीत महिलांच्यासद्यस्थितीचे अध्ययन शोध प्रबंध, प्रकाशन वर्ष २०१२ पृष्ठ क्र. - ११९, १३२, १३३, १३७, १३८, १४४, १४५, ११३.

१२. बोधनकार सुधीर, अलोणी विवेक, सामाजिकसंशोधन पद्धती, प्रकाशक - ललिता पुराणिक, प्रकाशनस्थळश्री. साईनाथ प्रकाशन नागपूर, प्रकाशन वर्ष २००३. पृष्ठ क्र. - ३०, ६८, ११०, १११.

१३. पाटील वा. भा.,संशोधन पद्धती, प्रकाशक - रंगराव पाटील, प्रकाशनस्थळ - प्रशांत पब्लिकेशन्स्, पुणे, प्रकाशन वर्ष - २००६ पृष्ठ क्र. - ७७, २४३.


LBP PUBLICATION

१४. मारुलकर विजया, मारुलकर अश्विनी, समाजकालीन भारतातील सामाजिक समस्या, प्रकाशक - भाग्यश्री फडके, प्रकाशनस्थळ - फडके प्रकाशन, कोल्हापूर, प्रकाशन वर्ष जानेवारी २०१५, पृष्ठ क्र. - १२.
१५. कुलकर्णी पी. के भारतातील सामाजिक समस्या, प्रकाशक - प्रमोद मुंजे, प्रकाशनस्थळ - विद्या प्रकाशन नागपूर, प्रकाशन वर्ष - १९९८ पृष्ठ क्र. - २५२.



**प्रा. पवळ रंजना भिमराव**
**सहा. प्राध्यापक, मालती वसंतदादा पाटील कन्या महाविद्यालय, इस्लामपूर. ता. वाळवा, जि. सांगली.**

LBP PUBLICATION